वैद्यकीय शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील सहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे १०० टक्के सहायक अनुदान (ग्रँट इन एड) असलेल्या "आपातकालीन वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मनुष्यबळ विकास (ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट फॉर इमर्जन्सी मेडिकल सर्विसेस) योजनेतंर्गत कौशल्य केंद्रे (स्कील सेंटर) स्थापित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : ईएमएस- २०१७/प्र.क्र.३३८/प्रशा-१
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नवीन मंत्रालय,
९ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई -४०० ००१,
दिनांक : ०७ मार्च, २०१९.

प्रस्तावना :

केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या "आपातकालीन वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मनुष्यबळ विकास (ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट फॉर इमर्जन्सी मेडिकल सर्विसेस) या योजनेतंर्गत स्थलांतर अवस्थेत रुग्णांना "आपातकालीन वैद्यकीय सेवा " पुरविण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे, तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर डॉक्टर, परिचारीका, अर्ध-वैद्यकीय प्रवर्गासाठी आपातकालीन आरोग्य सेवा या विषयाच्या अनुषंगाने उच्च प्रतीचे अभ्यासक्रम तयार करणे तसेच आपातकालीन आरोग्य सेवा प्रदान इत्यादीसाठी देशभरात कौशल्य केंद्रे (स्कील सेंटर) स्थापित करण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजनेतंर्गत विभागाच्या नियंत्रणाखाली सहा वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांत सदर कौशल्य केंद्रे उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

केंद्र शासनाच्या उपरोक्त योजनेतंर्गत विभागाच्या नियंत्रणाखालील सहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये कौशल्य केंद्रे (स्कील सेंटर) उभारण्यास खालील प्रमाणे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील ग्रॅण्ट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई, बै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज, डॉ. वै. स्मृ. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला व डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथे केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे १०० टक्के सहायक अनुदान (ग्रँट इन एड) असलेल्या "आपातकालीन वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मनुष्यबळ विकास (ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट फॉर इमर्जन्सी मेडिकल सर्विसेस) या योजनेतंर्गत कौशल्य केंद्रे (स्कील सेंटर) स्थापित करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२) उपरोक्त मान्यता, सदर योजनेतर्गत स्थापित करण्यात येणाऱ्या कौशल्य केंद्रासाठी राज्य शासनास येणारा खर्च हा संबंधित संस्थेस उपलब्ध होणाऱ्या निधीतूनच करण्यात येईल, सदर योजनेसाठी अतिरीक्त मनुष्यबळ मंजूर करण्यात येणार नाही, सदर केंद्रे चालविण्यासाठी पाच वर्षानंतर येणारा खर्च संस्थेस प्राप्त होणाऱ्या नियमित अनुदानातून भागविण्यात यावा, अन्य नवीन व अधिक आर्थिक भारास मान्यता देण्यात येणार नाही, या अटीच्या अधीन राहून प्रदान करण्यात येत आहे.

३) केंद्र शासनाच्या सदर योजनेतंर्गत भविष्यात अन्य शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कौशल्य केंद्र उभारण्यास केंद्र शासनाची सहमती प्राप्त झाल्यास याविषयी नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने याबाबत कार्यवाही करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

४) सदर योजनेतंर्गत केंद्र शासनाशी सामंजस्य करार करण्यास संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांना प्राधिकृत करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत विषयी सदर योजनेच्या अनुषंगाने स्वाक्षांकित करण्यात येणाऱ्या सामंजस्य करारातील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याची जवाबदारी संबंधित संस्थेचे अधिष्ठाता यांची राहील.

३. सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाने त्यांचे अनुक्रमे औपचारीक संदर्भ क्रमांक -५/ १४७५, दिनांक १०.०१.२०१९ व अनौसं क्रमांक ४१६/व्यय-१३/२०१८, दिनांक ०१.१२.२०१८ अन्वये दिलेले अभिप्राय व शासन मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०७१२५६३५४७१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arun M. Dahale

Digitally signed by Arun M. Dahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, cn=Arun M. Dahale
Date: 2019.03.07 14:35:38 +05'30'

(अ.मु.डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
४) महालेखापाल- १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
५) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
९) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
१०) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
११) सर्व मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) सर्व राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
१४) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
१५) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१७) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
१८) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय/आयुर्वेद/दंत महाविद्यालये व रुग्णालये.
१९) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२१) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२२) निवड नस्ती (प्रशा-१).